# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०१९-२०/महाडीबीटी/६४४ दिनांक : २८.०२.२०२०

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत...**

संदर्भ : -१. प्रस्तुत कार्यालयाचे पत्र दि. २१ जून, २०१९, २ ऑगस्ट, २०१९, ३ ऑगस्ट, २०१९, १६ ऑगस्ट, २०१९, २७ सप्टेंबर, २०१९, ५ ऑक्टोबर, २०१९, ७ ऑक्टोबर, २०१९, १ नोव्हेंबर, २०१९, ६ नोव्हेंबर, २०१९, १४ नोव्हेंबर, २०१९, २६ नोव्हेंबर, २०१९, २७ नोव्हेंबर, २०१९, १३ डिसेंबर, २०१९, २३ डिसेंबर, २०१९, ११ जानेवारी, २०२०, १५ जानेवारी, २०२०, ३ फेब्रुवारी, २०२०, ८ फेब्रुवारी, २०२०, २० फेब्रुवारी, २०२०. २५ फेब्रुवारी, २०२०.

२. मा. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/२८९५ व २८९६ दि. २६.०२.२०२०.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्य शासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून महाडीबीटी पोर्टल विकसित करण्यात आलेले आहे. यामध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. विद्यार्थी / महाविद्यालयांना अधिक माहितीसाठी सर्व योजनांबाबत महाडीबीटी पोर्टलवर पात्रता नियम, व्हीडीओ, मॅन्युअल उपलब्ध करुन याबाबतीत सर्व महाविद्यालय, संस्था, विद्यापीठांना वेळोवेळी परिपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

**उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना तसेच इतर शिष्यवृत्तीसाठी सन २०१९-२० करीता प्राप्त झालेल्या अर्जांचे प्रमाण हे मागील वर्षीच्या तुलनेत कमी असल्याचे निदर्शनास आल्यामुळे विद्यार्थी हित**

Scanned with CamScanner

विचारात घेता, ज्या पात्र विद्यार्थ्यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनांच्या शिष्यवृत्तीसाठी अद्यापही ऑनलाईन अर्ज भरलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन अर्ज भरणेसाठी दि. २९.०२.२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरच्या मुदतीमध्ये कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही. तरी अंतिम मुदतीची वाट न पाहता, शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना तातडीने महाडीबीटी पोर्टलवरुन अर्ज भरणेबाबत त्यांचे महाविद्यालयामार्फत कळविण्यात यावे.

तसेच महाविद्यालयाच्या स्तरावरुन विद्यार्थ्यांना त्रुटीपूर्ततेसाठी परत (sent back to applicant) केलेले अर्ज, विद्यार्थ्यांनी त्रुटी पूर्तता करुन पुनश्च (Re apply) करणे आवश्यक आहे. मुदतीनंतरचे सदरचे अर्ज आपोआप रिजेक्ट होतात. तरी याबाबत महाविद्यालयांनी विशेष कार्यशाळा आयोजित करुन त्यांचे महाविद्यालयामधील शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनांच्या शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज भरणेबाबत सहाय्य करण्यात यावे. जेणेकरुन एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित रहाणार नाही. तसेच त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी भरलेल्या ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्जांची महाविद्यालयाच्या स्तरावरुन पडताळणी करणेसाठी दि. ८ मार्च, २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तरी शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना शक्य तितक्या लवकर महाडीबीटी पोर्टलवरुन अर्ज भरणेबाबत कळविण्यात यावे. तसेच संस्था / महाविद्यालय / विद्यापीठांच्या लॉगीनमध्ये पडताळणीसाठी उपलब्ध असलेल्या अर्जांची रोजच्या रोज (DAILY BASIS) पडताळणी करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत संस्था / महाविद्यालय / विद्यापीठांच्या लॉगीनवर शिष्यवृत्ती अर्ज पडताळणीसाठी प्रलंबित राहणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी. तसेच महाविद्यालय स्तरावर अर्ज प्रलंबित राहिल्यामुळे एकही शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थी वंचित राहिल्यास सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/विद्यापीठांचे कुलसचिव यांची राहील याची नोंद घ्यावी.

विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांची उपस्थिती बाबतची माहिती नमूद करुन विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जावर इन्स्टिट्यूट लॉगीन वरुन उपस्थिती बाबतची माहिती नमूद करुन शिष्यवृत्ती अर्ज पुढील टप्प्यावर पाठविल्याशिवाय, संबंधित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण होणार नाही. महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांनी कोणत्याही परिस्थितीत त्यांचे स्तरावर शिष्यवृत्ती अर्ज प्रलंबित ठेऊ नयेत.

तसेच सद्यस्थितीत उच्च शिक्षण संचालनालयामार्फ त राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचे लाभ वितरण सुरु झालेले आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल लॉगीन करुन त्यांचे अर्जांची स्थिती तपासावी. डीडीओ द्वारे लाभ वितरीत केल्यास रिडीम बटण सक्र ीय होते. शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांना आधार लिंक बँक खात्यात लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी रिडीम बटण क्लिक करणे आवश्यक आहे. ह्या सूचना महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ स्तरावरुन सर्व विद्यार्थ्यांना तातडीने देण्यात याव्यात.

(डॉ. मोहन खताळ)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.

Scanned with CamScanner